# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे वेत्ती (ता.शिराळा, जि.सांगली) येथील प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(१) २३५५९ (१४-०८-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेत्ती (ता.शिराळा, जि.सांगली) येथील चांदोली प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये नुकसान झालेल्या गावदेवी मंदिर परिसरातील फळझाडे व इतर रायवळी झाडांच्या नुकसानीबाबत संबंधित ग्रामस्थांना नुकसान भरपाई प्राप्त झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत संबंधित ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे माहे मार्च, २०१४ वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिल्यानंतर महसूल भवन, मिरज यांच्याकडून नुकसान भरपाईची रक्कम घेवून जाण्याकरिता नोटीस काढण्यात आली होती, परंतु अद्यापही संबंधित ग्रामस्थांना रक्कमेचे वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतीत जिल्हाधिकारी, सांगली यांनी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) नं.१ सांगली यांना दिनांक २७ मार्च, २०१४ रोजीच्या पत्रान्वये भरपाईची रक्कम नियमानुसार वाटप करण्याबाबत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन यांनी याबाबतीत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) संबंधित खातेदारांना सन २००३ साली नुकसान भरपाईचे वाटप केलेले आहे. आदिष्टा विठलाई मंदिर वेत्तीबाबत त्यावेळी न्यासाची (ट्रस्ट) स्थापना झाली नसल्याने सन

२००३ साली नुकसान भरपाईचे वाटप करण्यात आलेले नाही. त्यानंतर अदिष्टा विठलाई मंदिर न्यासाची स्थापना सहायक धर्मादाय आयुक्त, सांगली यांच्याकडे झालेली आहे. अदिष्टा विठलाई मंदिर न्यासाची नुकसान भरपाई देण्याबाबत भूसंपादन अधिनियमानुसार तपासणी करुन तात्काळ कार्यवाही करण्याच्या लेखी सूचना जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.९ सांगली यांना देण्यात आलेल्या आहेत.

---

**पाथर्डी (जि. अहमदनगर) येथील १६ शेतकऱ्यांना इनामी जमिनीचा अंतर्गत नकाशा भूमी अभिलेखाकडे उपलब्ध नसल्याबाबत**

**(२) २९९७२ (२३-१२-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी तालुक्यातील (जिल्हा अहमदनगर) शिराळ येथील १६ शेतकऱ्यांना इनामी मिळालेल्या जमिनीचा अंतर्गत नकाशा भूमी अभिलेख कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना शेती करण्यास अनेक अडचणींना समोरे जावे लागते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी असणाऱ्या संबंधित, अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) व (५) तक्रारदार श्री.सुधीर दिनकर यांचेकडून दि.१०.०६.२०१५ रोजी जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाकडे मौजे शिराळ, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर येथील सर्व्हे नं.३७ मधील १० हेक्टर क्षेत्राच्या मोजणीबाबत तक्रार अर्ज प्राप्त झालेला आहे.

मौजे शिराळ येथील सर्व्हे नं.३७ चे सन १९७६ मध्ये महसूल विभागाकडून वाटप झालेले आहे. परंतु, त्यावेळी भूमि अभिलेख विभागाकडून मोजणी करुन घेण्यात आलेली नव्हती. सन १९८० मध्ये गावी झालेल्या एकत्रिकरण योजनेमध्ये सर्व्हे नं.३७ यास गट नं.४७० देण्यात आलेला आहे.

उक्त तक्रार अर्जात मागणी केल्याप्रमाणे तक्रारदार यांचे ४.०४ हेक्टर आर क्षेत्राचा नकाशा तयार झाला नसल्यामुळे त्या क्षेत्राची हद्द कायम करता येत नसल्याचे जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांनी तक्रारदार यांना दि.२८.०९.२०१५ रोजी कळविलेले आहे.

तसेच याबाबत संबंधित कब्जेदार यांनी उपअधीक्षक भूमि अभिलेख, पाथर्डी कार्यालयात पोटहिस्सा मोजणीबाबत कोणताही अर्ज केला नसल्यामुळे पोटहिस्सा मोजणीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

## लातूर जिल्ह्यात ई फेरफार उपक्रमामुळे मागील पाच महिन्यापासून फेरफार प्रक्रिया ठप्प झाल्याबाबत

**(३) ३००१९ (२३-१२-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात ई फेरफार उपक्रमामुळे मागील पाच महिन्यापासून फेरफार प्रक्रिया ठप्प झाली असल्याने जिल्ह्यातील बारा हजार फेरफार प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीची खरेदी केल्यानंतर तातडीने फेरफार करण्यासाठी सरकारने ई-फेरफार उपक्रम सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीची रजिस्ट्री होताच ऑनलाईन डाटा तहसील कार्यालयात जाऊन फेरफारची प्रक्रिया सुरु होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लातूर जिल्ह्यात सर्व तालुक्यात मार्च, २०१५ पासून हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या उपक्रमात अनेक दोष आढळल्याने मागील पाच महिन्यापासून एकही ऑनलाईन फेरफार झाले नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, ई-फेरफार उपक्रमातील त्रुटी दूर करण्याबाबत शासनाने कोणती आवश्यकती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.२३.०१.२०१३ अन्वये ई-फेरफार तथा ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम सुरु करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे.

प्रस्तुत प्रकरणी लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये मार्च, २०१५ पासून ऑनलाईन ई-फेरफार प्रक्रियेस सुरुवात झाली असून एप्रिल, २०१६ पर्यंत लातूर जिल्ह्यातील सर्व तालुकयांमध्ये ऑनलाईन प्रणालीतून एकूण ६०,१९० एवढे फेरफार घेण्यात आले असून त्यापैकी एकूण ४५,८५१ एवढे फेरफार प्रमाणित करण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीत लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये नोंदणीकृत दस्तावरुन १०,३०० फेरफार सदर प्रणालीतून घेण्यात आलेले असून एकूण ४५३६ फेरफार नोंदी प्रमाणित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे अनोंदणीकृत दस्तावरुन २३,३०३ फेरफार नोंदी घेण्यात आलेल्या असून एकूण १८,३६२ नोंदी प्रमाणित करण्यात आल्या आहेत.

तसेच डाटा प्रमाणिकरण आज्ञावलीवरुन २६,५८७ नोंदी भरण्यात आलेल्या असून त्यापैकी २२,९५३ नोंदी प्रमाणित करण्यात आलेल्या आहेत.

(६) व (७) ई-फेरफार कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा डाटा तयार करणे, तो स्टेट डाटा सेंटर (S.D.C) वर अपलोड करणे, ई-फेरफार आज्ञावलीच्या माध्यमातून फेरफार आज्ञावलीच्या माध्यमातून फेरफार नोंदी घेणे तसेच संगणकीकृत गा.न.नं७/१२ वितरीत करणे या प्रक्रियेत काही ठिकाणी डाटा एन्ट्री, सर्व्हर, कनेक्टीव्हीटी व आज्ञावली विषयक समस्या

उदभवल्याने त्यांच्या निराकरणार्थ  यथोचित उपाययोजना करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राकडून ई-फेरफार आज्ञावली व्हर्जन-२ विकसित करुन ती वापरास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्री व डाटा कन्व्हर्जनच्या झालेल्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तालिखित गा.न.न.७/१२ शी जुळविण्याकरीता "एडीट मोड्युल" दि.०७.०५.२०१६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. हस्तलिखित अधिकार अभिलेखांप्रमाणे गा.न.न.७/१२ चे संगणकीकृत उत्तारे जेथे वितरीत करणे शक्य नाही तेथे खरीप हंगामासाठी शेतकरी खातेदारांना केवळ कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनासाठी दि.३१ जुलै, २०१६ पर्यंत हस्तालिखित गा.न.नं.७/१२ उतारे देण्याची मुभा प्रदान करण्यात आली आहे. तसेच ई-फेरफार कार्यक्रमासाठी शासनाने स्टेट डाटा सेंटरवर अधिकचे स्टोरेज उपलब्ध करुन दिले आहे. यापरिणामी ई-फेरफार कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील बहुतांश अडचणीचे निराकरण झाले आहे.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यात सात बारा उता-यांचे संगणकीकरण करुन ऑनलाईन कामे करण्याबाबत**

**(४) ३०१०६ (०८-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यात सात बारा उता-यांचे संगणकीकरण करुन ऑनलाईन कामे करण्यासाठी जानेवारी, २०१५ मध्ये शुभारंभ केला, परंतु त्यात त्रुटी आल्याने तलाठ्यांनी नागरीकांच्या रोषाने त्रस्त झालेने सर्व कर्मचारी सामूहिक रजेवर गेले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सात बाराच्या संगणकीकरणातील त्रुटी दूर करण्याबाबत व रजेवर गेलेल्या कर्मचाऱ्यांच्या विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) ''ई-फेरफार'' कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत गा.न.नं.. ७/१२ च्या डाटा एन्ट्री विषयक, स्टेट डाटा सेंटर मधील सर्व्हरविषयक, नेटवर्क कनेक्टीव्हीटी विषयक व ई-फेरफार आज्ञावलीविषयक समस्या काही ठिकाणी उदभवल्याने भोर तालुक्यातील तलाठी दि. २७.०८.२०१५ ते ०६.०९.२०१५ या कालावधीत सामूहिक रजेवर गेले होते.

'ई-फेरफार'' कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील अडचणी विचारात घेवून राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राकडून ''ई-फेरफार'' आज्ञावली व्हर्जन-२ विकसित करुन ती वापरास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मधील डाटा एन्ट्री व डाटा कन्व्हर्जनच्या झालेल्या चुका दुरुस्त  करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ शी जुळविण्याकरिता एडीट मोडयुल

(Edit Module) दि. ०७.०५.२०१६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. हस्तलिखित अभिलेखांप्रमाणे गा.न.नं. ७/१२ चे संगणकीकृत उतारे जेथे वितरीत करणे शक्य नाही तेथे खरीप हंगामासाठी शेतकरी खातेदारांना केवळ कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनासाठी दि. ३१ जुलै, २०१६ पर्यत हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे देण्याची मुभा प्रदान करण्यात आली आहे.

"ई-फेरफार" कार्यक्रमासाठी शासनाने स्टेट डाटा सेंटर येथे अधिकचे ५० TB स्टोरेज उपलब्ध करुन दिले असून प्रत्येक मंडळ स्तरावर तलाठी/मंडळ अधिका-यांसाठी हायस्पीड कनेक्टीव्हीटीसह कार्यकक्ष (Work Station) उभारण्याची कार्यवाही सुरु आहे. यापरिणामी ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीतील बहुतांश अडचणीचे निराकरण झाले आहे.

तहसिलदार, भोर यांनी उक्त कालावधीतील कर्मचा-यांची गैरहजेरी विनावेतन रजा म्हणून मंजूर केली आहे.

---

## परराज्यातील पर्ससीन नेट आणि हायस्पीट ट्रॉलर्सचे अतिक्रमण रोखू न स्थानिक मच्छिमारांच्या व्यवसायाला संरक्षण देण्याबाबत

**(५) ३०२९५ (२३-१२-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परराज्यातील पर्ससीन नेट आणि हायस्पीड ट्रॉलर्सचे अतिक्रमण रोखून स्थानिक मच्छिमारांच्या व्यवसायाला संरक्षण देण्यासाठी संयुक्त सागरी गस्तीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाकडून केव्हा अंमलबजावणी होणार आहे, व, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२२-०८-२०१६) :**(१) व (२) परराज्यातील पर्ससनी नेट आणि हायस्पीड ट्रॉलर्सचे अतिक्रमण रोखून मच्छिमाराच्या व्यवसायाला संरक्षण देण्याच्या हेतूने शासनाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत सागरी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील पारंपारिक मच्छिमारांचे हित जोपासण्यासाठी आणि राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रातील अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात गस्त घालण्यासाठी शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-१११५/ प्र.क्र.१७४/पदुम-१४, दि. १ सप्टेंबर, २०१५ नुसार एकूण ५ गती नौका भाड्याने घेण्यास शासनाने मान्यता प्रदान केली आहे. तसेच या व्यतिरिक्त UNDP प्रकल्पाअंतर्गत वन विभागाच्या सल्ल्याने सिंधुदुर्ग येथे (कांदळवन क्षेत्र) आणखी एक जादा गस्ती नौका भाड्याने घेऊन, १) सागरी पोलीस विभागातील कर्मचारी, २) वन विभागाचे कर्मचारी आणि ३) मत्स्यविभागांचे कर्मचारी यांचेकडून संयुक्तपणे गस्त घालण्याचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गिरगाव चौपाटीवर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मारकासाठी जागा देणाऱ्या कोळी बांधवांना गिरगाव चौपाटीवरून कायमचे हद्दपार करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(६) ३०९०१ (०८-०१-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरगाव चौपाटीवर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मारकासाठी जागा देणाऱ्या कोळी बांधवांना गिरगाव चौपाटीवरून कायमचे हद्दपार करण्याचा निर्णय मत्स्यव्यवसाय विभागाने घेऊन तशा नोटीसा दि.२८ ऑगस्ट, २०१५ रोजी कोळी बांधवास बजावल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरगाव चौपाटीवरील ब्रिटीश काळापासून अस्तित्वात असलेल्या कोळी वाड्यातील कोळी बांधवांना अन्यत्र हलविण्याची कारणे काय आहेत, व स्मारका व्यतिरिक्त उर्वरित जागेचा वापर कोणत्या कामासाठी करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, कोळी बांधवांच्या उपजिविकेचा मच्छिमारी व्यवसाय व त्यांचे निवासस्थान उध्वस्त होऊ नये यासाठी शासनाने निर्णयाचा पुनर्विचार करावा अशी मागणीही कोळी बांधव व लोकप्रतिनिधींनी मा.मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांकडे माहे ऑगस्ट, २०१५ पासून अनेक वेळा केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२२-०८-२०१६) :**(१) नाही. हे खरे नाही.

(२) गिरगांव चौपाटीवर कोळी बांधवाना विभागामार्फत हलविण्यात आले नसून, बंदरातील नौका नजिकाच्या मासेमारी बंदरातून करण्याबाबत नोटीस देण्यात आल्या आहेत. स्मारकाच्या जागेबाबत कोणत्याही नोटीस देण्यात आले नाही.

(३) होय.

(४) संबंधित परवानाधारक नौका मालकांना नजीकच्या मासेमारी बंदरातून मासेमारी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण किनारपट्टी लगत मच्छिमारी करणा-या मच्छिमार व्यावसायकांचे बंदरात गाळ साचल्याने व डिझेल परतावा मिळण्यास होत असलेला विलंब**

**(७) ३११५१ (०८-०१-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टी लगत मच्छिमारी करणा-या मच्छिमार व्यावसायकांचे बंदरात गाळ साचल्याने व डिझेल परतावा मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे मच्छिमार व्यावसायकांची आर्थिक व व्यावसायीक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छिमार बंदर नजिक साचलेला गाळ काढण्यात व डिझेल तात्काल देण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. महादेव जानकर (१६-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) ही बाब बंदरे विभागाच्या अखत्यारीतील असून उपलब्ध तरतूदीनुसार गाळ काढण्याचे काम बंदरे विभागाच्याकडून करण्यात येते. या विभागामार्फत उपलब्ध तरतूदीप्रमाणे जिल्हानिहाय डिझेल परवाना अदा करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महापारेषण कंपनी प्रशासनाच्या हेतुपुरस्पर भुमीकेमुळे मागासवर्गीय कर्मचा-यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(८) ३१६१३ (०८-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महापारेषण कंपनी प्रशासनाच्या हेतुपुरस्पर भुमीकेमुळे मागासवर्गीय कर्मचा-यांवर होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ तसेच वर्ग-४ च्या कर्मचा-यांना पदोन्नती देणे, सहाय्यक यंत्र चालक पदांमध्ये आयटीआय धारक तंत्रज्ञाना सामावून घेणे, मागासवर्गीयांच्या वर्षानुवर्षे असलेल्या अनुशेष भरणे या व इतर मागण्या मान्य करण्यासाठी मुंबईतील वांद्रे येथील महापारेषण कंपनीच्या कार्यालयासमोर हजारो कामगारांनी दिनांक ०२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यंसुमारास धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचा-यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०९-२०१६) :**(१) होय.
(२) वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे, अनुशेष भरणे, अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या करणे इ. मागण्या आहेत. त्यानुषंगाने महापारेषण कंपनीमार्फत नियमानुसार वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात ५० टक्के प्रकल्पग्रस्त नोकरी पासून वंचित असल्याबाबत**

**(९) ३२४७२ (२३-१२-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात ५० टक्के प्रकल्पग्रस्त नोकरी पासून वंचित असल्याचे व ५०० प्रकल्पग्रस्त मागील पाच वर्षापासून अवघ्या सहा हजार रुपये मानधनावर प्रशिक्षणार्थी म्हणून कार्यरत असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८० मध्ये औष्णिक विद्युत केंद्राकरिता शेतकऱ्यांनी ११ हजार हेक्टर शेतीयोग्य जमीन व ५२ गावठाणे भूसंपादित करण्यात आले असून अद्यापही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने सन १९८० पासून बाधीत प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०९-२०१६) :**(१) महानिर्मिती कंपनीतर्फे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामुळे बाधीत झालेल्या एकूण ३,३८१ प्रकल्पग्रस्तांपैकी २,६३२ प्रकल्पग्रस्तांना म्हणजेच सुमारे ७८% प्रकल्पग्रस्तांना महानिर्मती कंपनीच्या सेवेत दि.३०.०६.२०१५ रोजीपर्यंत सामावून घेण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही. महानिर्मिती कंपनीतर्फे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ॲश बंडसाठी जमिन संपादित करण्यात आलेल्या ५ गावांतील पात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनप करण्यात आले आहे.

(४) महानिर्मिती कंपनीतर्फे प्रकल्पग्रस्त उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण देण्यात येते. तसेच, प्रशिक्षणासाठी विद्यावेतन देण्यात येते. प्रगत कुशल प्रशिक्षणासाठी प्रतिमाह रु.८,०००/- व प्रशिक्षण पूर्व केलेल्या उमेदवारांना प्रतिमाह रु.१०,०००/- देण्यात येतात. प्रकल्पग्रस्तांसाठी शासकीय सेवेत सामावून घेण्याची वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथील करण्यात आली आहे. प्रकल्पग्रस्तांचा लाभ सोडून देणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना एक रक्कमी रु.५,००,०००/- अनुदान किंवा वयाची ५८ वर्ष पूर्ण होईपर्यंत रु.१०,०००/- प्रतिमाह निर्वाह भत्ता देण्यात येतो. नोकरीचा हक्क सोडू इच्छिणाऱ्या प्रकल्पग्रस्तांस स्वत:चा धंदा सुरु करण्यासाठी एक रक्कमी रु.५,००,०००/- अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवपूर परिसरातील (धुळे) सर्व्हे नं १२२ मधील दोन एकर जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस देण्याबाबत**

**(१०) ३३५७३ (२३-१२-२०१५). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवपूर परिसरातील (धुळे) सर्व्हे नं १२२ मधील दोन एकर जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस देण्याच्या बदल्यात धुळे महापालिकेकडे विज बिलाची असलेली थकित रक्कम माफ करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ४ ऑगस्ट, २०१५ रोजी मा. ऊर्जा मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुंषगाने शासनामार्फत कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे व त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) वीज उपकेंद्रास जागा विनामूल्य देण्याचे शासनाचे धोरण असल्याने संबंधित जागेच्या बदल्यात धुळे महापालिकेची वीज बिलाची थकित रक्कम माफ करण्याची विनंती मान्य करता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड (ता.पेण, जि.रायगड) येथील बाळगंगा नदीवर बांधण्यात येत असलेल्या धरणामुळे गावातील ३४३४ प्रकल्पग्रस्तांना नवीन भूसंपादन कायद्याच्या तरतूदीनुसार भरपाई देण्याबाबत**

**(११) ३३६२७ (२२-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (ता.पेण, जि.रायगड) येथील बाळगंगा नदीवर बांधण्यात येत असलेल्या धरणामुळे निफाड, करोडी, वरसई, आष्टे, इनाम,गागोदे खुर्द.गागोदे ब्रु.जावळी, पाडले, वाशीवली, निधीवली, मोहिली, इनाम, करंबळी आदी गावातील ३४३४ प्रकल्पग्रस्तांचे नवीन भूसंपादन कायद्याच्या तरतूदीनुसार भरपाई देण्याचा दिनांक २३ सप्टेंबर,२०१५ रोजी शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार ३४३४ प्रकल्प पिडीतांना प्रती व्यक्तीनिहाय किती रुपये आर्थिक मदत देवून,त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) बाळगंगा नदी धरण प्रकल्पासाठी मौजे निफाड, करोडी, वरसई, आष्टे, मोहोली इनाम, गागोंदे खुर्द, गगोदे ब्रु, जावळी, पाडले, वाशिवली, निधवली मोहीलीखालसा, करंबेळी या गावातील जमिनी संपादित करण्यासाठी निवाडे

घोषित करण्यात आले असून, निवाडे भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ११ अन्वये करण्यात आले असले तरी, नुकसान भरपाई निश्चित करताना भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुनर्स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३ चे कलम २४ मधील तरतूदीप्रमाणे व कलम २६ ते ३० अन्वये नुकसान भरपाई निश्चित करण्यात येऊन खातेदारांना उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड, अलिबाग यांचेमार्फत अदा करण्यात येत आहे.

सदरहू प्रकल्पासाठी कलम ११ (१) ची अधिसूचना दि. २३.१२.२०११ रोजी प्रसिध्द झाली आहे. कलम १३ (१) ची अधिसूचना दि. ३.५.२०१२ व कलम १३ (३) ची अधिसूचना दि. २०.१२.२०१४ रोजी प्रसिध्द झाली असून सदर प्रकल्पास भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ लागू होत नाही. परंतू महाराष्ट्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन कायदा, १९९९ नुसार १८ नागरी सुविधा देय आहेत. सदरहू प्रकल्पासाठी कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांच्याकडून १८ नागरी सुविधांबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघाला भूखंड देण्याबाबत**

**(१२) ३४८७४ (१८-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात सर्व सोयीयुक्त वृध्दाश्रम व्हावे याकरिता रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघाला तत्कालीन महसूल राज्यमंत्री सुरेश धस यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना स्पष्ट लेखी सूचना देऊनही या संघाला भूखंड देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे प्रस्ताव झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रतिनिधी वारंवार जिल्हाधिकाऱ्यांकडे याचा पाठपुरावा करीत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात सर्वसोयीयुक्त वृध्दाश्रम बांधण्याकरिता भूखंड देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघास रत्नागिरी तालुक्यातील कुवारबांव येथील स.न. १४ हि.१/५ मधील ८२ गुंठे शासकीय जमीन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाचे अनुषंगाने तत्कालीन राज्यमंत्री (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिले होते.

मात्र मौ.कुवारबांव येथे शासकीय कार्यालयांसाठी जागेची मागणी मोठ्या प्रमाणात असून उपलब्ध जागा अत्यल्प आहे. शासन परिपत्रक क्र. जमीन०२/२००६/प्र.क्र.१७/ज-१ दि.२८.०६.२००६ अन्वये शासकीय जमिनी वितरीत करतान त्या जमिनीची शासकीय कार्यालयांसाठी आवश्यक्ता तपासण्याकरीता अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्यात

आलेली आहे. त्यानुसार मागणी केलेल्या जागेची भविष्य काळात शासकीय कार्यालयांसाठी आवश्यकता असल्याने सदर जागा वृध्दाश्रमासाठी मिळण्याबाबतची रत्नागिरी शहर जेष्ठ नागरिक संघ रत्नागिरी यांची विनंती जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या दि.१८.०९.२०१४ च्या पत्रान्वये अमान्य करण्यात आली आहे.

---

**पशुचिकित्सालयात सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्याने औषधी नेण्यासाठी आलेल्या एका पशुमालकाकडे ५०० रुपयांची मागणी केल्याबाबत**

**(१३) ३५१३१ (२३-१२-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद अकोला मधील महान येथील पशुचिकित्सालयात सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्याने औषधी नेण्यासाठी आलेल्या एका पशुमालकाला ५०० रुपयांची मागणी केल्याची बाब ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळूण आले त्याअनुषंगाने दोषी असणाऱ्या पशुधन विकास अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) गट विकास अधिकार, पंचायत समिती, वाशी टाकळी जि. अकोला यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत महान येथील पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये कार्यरत सहाय्यक पशुधन विकास अधिकारी श्री. साखरे यांनी तक्रारदारास त्यांचे म्हशीवर औषधोपचार करण्यासाठी दवाखान्यात उपलब्ध नसलेल्या औषधी लिहून देण्यात आल्यास साधारणपणे रु. ५००/- इतक्या रकमेची औषधी लागतील असे सांगीतले. सदर तक्रारदाराने औषधी बाहेरुन आणण्यास असमर्थता दर्शविल्याने, दवाखान्यात उपलब्ध असलेल्या औषधीद्वारे उपचार करण्यात आले. तक्रारदारास समजावून सांगितल्यानंतर तक्रारदाराने तक्रार मागे घेतली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शेतक-यांच्या सातबारा ऑनलाईन योजनेमध्ये सातबारांमध्ये चुका असल्याबाबत**

**(१४) ३६६१९ (२३-१२-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शेतक-यांच्या सातबारे उतारा-याचे आधुनिकरण करताना शासनाने ऑनलाईन योजना राबवली होती. त्या ऑनलाईन सातबारे उतारामध्ये असंख्य चुका होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांच्या सातबारा मध्ये चुकीच्या नोंदीमुळे शेतकऱ्याची अनेक कामे प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २३.०१.२०१३ अन्वये "ई-फेरफार" आज्ञावलीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम राज्यात सुरु करुन जमिनींचे अधिकार अभिलेख (गा.न.नं.७/१२) संगणकीकृत होऊन ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत व्हावेत या दृष्टीने "ई-फेरफार प्रकल्प" कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथील शेतकऱ्यांच्या बाबतीत संगणकीकृत गा.न.नं.७/१२ उताऱ्यांमध्ये काही प्रमाणात चुका आढळून आल्या होत्या, परंतू सदरच्या चुका दुरुस्त करुन शेतकऱ्यांना विहीत वेळेत गा.न.नं.७/१२ उतारा उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

ई-फेरफार कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत गा.न.नं.७/१२ चा डाटा तयार करणे, तो स्टेट डाटा सेंटर (SDC) वर अपलोड करणे, ई-फेरफार आज्ञावलीच्या माध्यमातून फेरफार नोंदणी घेणे तसेच संगणकीकृत गा.न.नं.७/१२ वितरीत करणे या प्रक्रियेत काही ठिकाणी डाटा एन्ट्री, सर्व्हर, कनेक्टीव्हीटी व आज्ञवली विषकय समस्या उदभवल्याने त्यांच्या निराकरणार्थ यथोचित उपाययोजना करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राकडून ई-फेरफार आज्ञावली व्हर्जन-२ विकसित करुन ती वापरास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच यासंदर्भातील अडीअडचणींचे निराकरण करण्यासाठी उपविभागीय तसेच जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्री व डाटा कन्व्हर्जनच्या झालेल्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ शी जुळविण्याकरीता एडीट मोड्युल (Edit Module) दि.०७.०५.२०१६ रोजी उपलबध करुन देण्यात आले आहे. हस्तलिखित अभिलेखांप्रमाणे गा.ननं. ७/१२ चे संगणकीकृत उतारे जेथे वितरीत करणे शक्य नाही तेथे खरीप हंगामासाठी शेतकरी खातेदारांना केवळ कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनासाठी दि.३१ जुलै, २०१६ पर्यंत हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे देण्याची मुभा प्रदान करण्यात आली होती. तसेच ई-फेरफार कार्यक्रमासाठी शासनाने स्टेट डाटा सेंटरवर अधिचे स्टोरेज उपलब्ध करुन दिले आहे. यापरिणामी ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीतील बहुतांश अडचणींचे निराकरण झाले आहे.

---

**कोळगाव (ता.भडगाव, जि.जळगाव) वीज उपकेंद्रात तीन वर्षापासून कनिष्ठ अभियंता नसल्याबाबत**

**(१५) ३७८४१ (०८-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळगाव (ता.भडगाव, जि.जळगाव) (सबडीव्हजन क्रमांक ३) या वीज उपकेंद्रात तीन वर्षापासून कनिष्ठ अभियंता नसल्याने अतर्गत येणाऱ्या १२ गावांचा वीजेचा कार्यभार बदली झालेल्या सहाय्यक लाईनमनच्या (पूर्वीचे वायरमन) यांच्याकडे सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज उपकेंद्रात कायमस्वरूपी कनिष्ठ अभियंता, वायरमनची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) कोळगाव उपकेंद्रात सहाय्यक अभियंता यांची दि.०१.०२.२०१६ पासून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदर कार्यालयात ४ तंत्रज्ञ व ५ विद्युत सहाय्यक कार्यरत असून केवळ २ पदे रिक्त आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील थेऊर येथील मंडल अधिकारी हरिदास चाटे यांना निलंबित केल्यावरही कार्यालयात काम करीत असल्याबाबत**

**(१६) ३८१७७ (०८-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील थेऊर येथील मंडल अधिकारी हरिदास चाटे हे कारवाई प्रकरणात दोषी आढळून आल्याने दि.१४.८.२०१५ रोजी त्यांना निलंबित करण्यात आले असतांना ते २२ ऑगस्ट, २०१५ रोजी शनिवार शासकीय सुट्टी असूनही कार्यालयात काम करीत असल्याचे आढळून आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१६) :**(१) (२) व (३) श्री. हरीदास चाटे, मंडळ अधिकारी, थेऊर यांना जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक १४.८.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते.

सदर आदेश श्री. चाटे यांच्यावर दिनांक १९.०८.२०१५ रोजी बजाविण्यात आले. दप्तर तपासणी केली असता, श्री. चाटे यांनी दिनांक १९.८.२०१५ नंतर कोणतेही कार्यालयीन कामकाज केल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मौजे मानेगाव (ता.जळगांव जामोद, जि.बुलडाणा) येथील गट नं. ३६, ३५२, ३५९, ३५३ पडिक शेतीवरील केलेले अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(१७) ३९६५९ (१३-०१-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मानेगाव (ता.जळगांव जामोद, जि.बुलडाणा) येथील गट नं. ३६, ३५२, ३५९, ३५३ या खाजगी मालकीच्या पडिक शेतीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत माजी लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी (बुलडाणा) तसेच महसूल प्रशासनाकडे दिनांक ७ डिसेंबर,२०११ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शेतातील शेकडो ब्रास माती अतिक्रमणधारकांनी विकली व अवैध जोडणी करुन बागायत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्न भाग (१) व (२) च्या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) सदरहू प्रकरणी दि. ०१/१२/२०१२ रोजीच्या प्राप्त झालेल्या एका तक्रारदाराच्या निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांनी दि.१८/१२/२०१२ च्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा, उप विभागीय अधिकारी, दर्यापूर व तहसिलदार, दर्यापूर यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने दि. ०८/०३/२०१३ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवलानुसार मौजे मानेगाव. ता.जळगाव जामोद येथील गट नं. ३५३ व ३५७ या ई-क्लास सरकारी जमिनी आहेत. गट नं. ३६,३५२ व ३५९ पुर्वी गुरे चराईकरिता भर आकारी राखीव ठेवले होते. सदर जमिनीच्या निगराणीसाठी शासनाने पंचांची नियुक्ती केली होती. सदरहू जमिनी गैरअर्जदाराचे पुर्वजांच्या मालकीच्या नसून शासकीय मालकीच्या असल्याने बेकायदेशीररित्या व नियमबाह्य लावण्यात आलेले वारसांचे फेरफार रद्द करुन या जमिनी शासनाच्या नांवे करण्याबाबत उप विभागीय अधिकारी, जळगाव (जामोद) यांनी आदेश पारित केले आहेत. गट नं. ३६, ३५२, ३५३, ३५९ या जमिनीवर अतिक्रमण आढळून आले नसून कुठल्याही प्रकारची माती विक्री केली नसल्याचे तसेच अवैध जोडणी करुन बागायता केल्याचे निदर्शनास आले नसल्याचे मंडळ अधिकारी, पिंपळगांव काळे, ता.जळगाव (जामोद) यांनी केलेल्या मौका पाहणीमध्ये आढळून आले आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली येथील वीज मंडळ कार्यालयात सहाय्यक वीज अभियंता यासह अन्य पदे रिक्त असल्याबाबत**

**(१८) ४००६६ (२०-०४-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली येथील वीज मंडळ कार्यालयात सहाय्यक वीज अभियंता यासह अन्य पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०९-२०१६) :**(१) होय.
(२) सदर रिक्त पदे भरण्याबाबतच्या सूचना महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयाकडून संबंधित मंडळ व विभागीय कार्यालास देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील ५१८ मालमत्ता धारकांनी रहिवाशी जागेवर व्यवसाय प्रयोजनार्थ परवानगी न घेतल्याने करासह ४० पट दंड आकारण्याच्या नोटीस देण्यात आल्याबाबत**

**(१९) ४०३३१ (२०-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील भूमी अभिलेख कार्यालयांतर्गत येणा-या यावल फैजपुर शहरासह ग्रामीण भागातील ५१८ मालमत्ता धारकांनी रहिवाशीच्या जागेवर व्यावसाय प्रयोजनार्थ परवानगी न घेतल्याने करासह ४० पट दंड आकारण्याच्या नोटीस देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या दरम्यारन निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी, तब्बल १८ वर्षांनी शासनातर्फे नोटीस देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०९-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी उपअधिक्षक भूमि अभिलेख, यावल यांच्याकडून दि.२०.११.२०१५ रोजी मौजे किनगावं बु. येथील ३६, मौजे किनगांव खुर्द-०७ व चिंचोली, ता.यावल येथील १९ तसेच दि.०५.१२.२०१५ रोजी फैजपूर शहरातील २४७ न्हावी गावातील ७८ आणि दि.०९.१२.२०१५ रोजी यावल शहरातील १२५ अशी एकूण ५१२ मिळकतींच्या वापरात बदलाबाबतचे प्रस्ताव रुपांतरीत कर व ४० पट दंडासह मंजूरीसाठी उपविभागीय अधिकारी, फैजपूर भाग फैजपूर यांच्याकडे पाठविण्यात आले हाते. त्याअनुषंगाने, उपविभागीय अधिकारी, फैजपूर भाग फैजपूर यांनी सदर प्रस्तावांना मंजूरी देऊन तहसिलदार, यावल यांना संबंधितांकडून सदरच्या रक्कमेची वसुली करण्याचे सुचित केले आहे. त्यानुसार संबंधित तलाठी यांनी त्यांच्यास्तरावरुन मागणी नोटीसा संबंधित मिळकत धारकांना दिलेल्या आहेत.

---

**मोरा.कोळीवाडा (ता.उरण, जि.रायगड) येथील मच्छिमारांच्या समस्यांचे निवारण करण्याकरिता बैठक घेण्याबाबत**

**(२०) ४०३६१ (२०-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरा.कोळीवाडा (ता.उरण, जि.रायगड) येथील मच्छिमारांच्या समस्यांचे निवारण करण्याकरिता बैठक घेण्याबाबत मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा सुमारास निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर बैठक आयोजित न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सदरहू बैठक घेण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१८-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बारामती पंचायत समिती पशुसंवर्धन विभागा मार्फत राज्यसरकारच्या योजनेतील अनुसूचित जाती अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या दुधाळ संकरीत गाई विकल्याबाबत**

**(२१) ४०४३३ (१७-०५-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती पंचायत समिती पशुसंवर्धन विभागा मार्फत राज्यसरकारच्या योजनेतील अनुसूचित जाती अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या दुधाळ संकरीत गाई लाभार्थींनी कर्नाटकाच्या एका व्यापाऱ्यास विकून राज्यसरकारची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्य सरकारच्या योजनेतील दुधाळ संक्रीत,गायी विकणाऱ्यांवर व विकत घेणाऱ्या व्यापाऱ्यांवर तसेच याबाबत दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) व (४) सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ०२ दुधाळ जनावरांचे गट वाटप या योजनेंतर्ग पंचायत समिती, बारामती अंतर्गत निवडलेल्या ५२ लाभार्थीपैकी ११ लाभार्थ्यांना दि.१४.०१.२०१६ रोजी जनावरांचा बाजार जळोची, ता.बरामती, जि.पुणे येथून दुधाळ जनावरे खरेदीबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने संबंधित लाभार्थी, पशुधन विकस अधिकारी (विस्तार), संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यांचे प्रमुख व विमा प्रमुख यांच्या उपस्थित लाभार्थ्यांनी पसंत केलेली जनावरे खरेदी करुन देण्यात आलेली होती. खरेदी केलेल्या ११ जनावरांच्या विम्याकरीता टॅगिंग करण्यात आले होते. संबंधित विक्रेत्यांना दि.१५.०१.२०१६ रोजी पंचायत समिती बारामती येथे उपस्थित राहून जनावरांची खरेदी किंमत अदा करण्याचे निश्चित झाले होते. परंतु, विक्रेत्यांनी दि.१४.०१.२०१६ रोजी जनावरांच्या रकमा मिळाल्याशिवाय जनावरे देणार नाही, अशी भूमिका घेऊन लाभार्थ्यांना जनावरांचा ताबा दिलेला नाही.

सदर निवड केलेल्या लाभार्थ्यांना दि.२३.०१.२०१६ व दि.२८.०१.२०१६ रोजी अनुक्रमे जनावरांचा बाजार काष्टी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर आणि जळोची, ता.बारामती जि.पुणे येथून जनावरे खरेदी करुन देण्यात आलेली असून, सद्यस्थितीत लाभधारकांच्या घरी जनावरे असल्याची खात्री करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी शासकीय अनुदानाचा गैरवापर झालेला नाही. तथापि, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, बारामती आणि संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यांचे अधिकारी यांनी सदरची बाब योजना अंमलबजावणी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देणे अपेक्षित असताना, तसे हेतु पुरस्सरपणे केलेले नाही, म्हणून आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाने दि.०८.०६.२०१६ च्या पत्रान्वये पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत संमिती, बारामती यांना कारणे दाखवा नोटीस बजावलेली असून, त्या अनुषंगाने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त आणि प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन पुणे विभाग, पुणे यांनी पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, बारामती यांचा खुलासा मान्य करण्याची शिफारस आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयास केलेली आहे. आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाच्या स्तरावर सदर प्रकरणी खुलासा मान्यतेबाबतची कार्यवाही प्रलंबित आहे.

---

**पेण तालुक्यातील धरमतर खाडीत मच्छीमारी करणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळत नसल्याबाबत**

**(२२) ४०८७७ (२०-०४-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण तालुक्यातील डोलवी येथे धरमतर खाडीच्या बाजूला जेएसडब्ल्यू कंपनी व अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथे पी.एन.पी. कंपनी या दोन्ही प्रकल्पामुळे धरमतर खाडीत मच्छीमारी करणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री मत्स्यव्यवसाय, यांच्याकडे माहे डिसेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी व मच्छिमारांच्या समस्यांबाबत कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने अभ्यास करण्यासाठी समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बराच कालावधी होवून सुद्धा गठीत केलेल्या समितीने आजतागायत आपला अहवाल सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकल्पबाधित मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१४-०७-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) नाही. दि.२४.२.२०१६ अन्वये समिती पुर्नगठित करण्यात आली असून सदर समितीने सहा महिन्यात अहवाल सादर करावयाचा आहे.
(४) एक समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील उचित निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामपंचायत हद्दीत कचरा टाकण्यासाठी डंम्पिग ग्राऊडकरिता जागा उपलब्ध करणेबाबत**

**(२३) ४०९७३ (२०-०४-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पेझारी ग्रामपंचायत हद्दीतील डंम्पिग ग्राऊंडसाठी शासनाची जागा उपलब्ध करणेबाबत ग्रामपंचायत तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने मागणी केलेल्या ग्रामपंचायतींना डंम्पिग गाऊंडसाठी शासकीय जमिन उपलब्ध करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) व (२) मौजे पेझारी ता.अलिबाग येथील ग. नं.८१ क्षेत्र०-६९-६ हे.आर ही सरकारी गुरचरण जमीन ग्रामपंचयात आंबेपूर यांना डंम्पिग ग्राऊंडसाठी देणेबाबतची मागणी लोकप्रितिनिधींनी केली होती. डंम्पिग ग्राऊंडसाठी मागणी करण्यात आलेली जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे विकास नियंत्रण नियमावलीनुसार हरित - २ या वापर विभागात असून CRZ-I मध्ये असल्याने तसेच सदर जमिनीवर कांदळवन असल्याने सदर जमिनीच्या डंम्पिंग ग्राऊंडसाठी वापर अनुज्ञेय नाही. मौजे पेझारी येथील स.नं. ८२, ८७ अ १, ८७ ब १ व ८७ ब २ या जमिनीही CRZ-I व CRZ-II मध्ये अंतर्भुत असून गावठाणाच्या २००.०० मी अंतराच्या आत गावठाण डंम्पिंग ग्राऊडसाठी अनुज्ञेय नाही. उक्त प्रयोजनार्थ अलिबाग तालुक्यातील अन्य शासकीय जमिनीची उपलब्धता तपासण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उरण तालुक्यातील (जि.रायगड) काही शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून त्या ठिकाणी अधिकृत कंटेनर यार्ड तयार करून शासकीय जमीन हडप केल्याबाबत**

**(२४) ४१४३६ (२०-०४-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) काही शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून त्या ठिकाणी अधिकृत कंटेनर यार्ड तयार करून शासकीय जमीन हडप केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी महसूल विभागाकडे तक्रारी दाखल करूनही माहे जानेवारी २०१६ पर्यंत महसूल विभागाने संबंधितांवर कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) मौजे जासई ता.उरण येथील स.नं.१६४/१९ क्षेत्र १-८१ हे आर ही शासकीय जमीन ग्रामपंचायत जासई यांना "आठवडा बाजार व सार्वजनिक प्रयोजना" साठी विशिष्ट अटी व शर्तीवर देण्यात आलेली होती. परंतु, शर्तभंग झाल्यामुळे सदर जमीन दि.२/६/२००५ रोजी सरकार जमा करण्यात आली असून सद्य:स्थितीत ग्रामपंचायत जासई सदर जागेचा वापर रिकामे कंटेनर यार्डसाठी करीत असून या जमिनीबाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८८०२/२००५ दाखल आहे.

तसेच मौजे पागोटे ता.उरण येथील स.नं. १८१/१(१) क्षेत्र २-९३-० हे.आर या गुरचरण जमिनीवर अतिक्रमण करुन अनधिकृतपणे केलेल्या भोगवट्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५३(३) अन्वये श्री.पांडुरंग गजाजन ठाकूर व इतर ३ यांना जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि.२४/२/२०१४ रोजी नोटीस दिलेली आहे. परंतु, जिल्हाधिकारी, रायगड यांचे या आदेशाविरुध्दा संबंधितांनी अपर आयुक्त कोकण यांचेकडे दाखल केलेले अपील अपर आयुक्त, कोकण यांनी दि.११/१२/२०१४ रोजीच्या आदेशान्वये अमान्य करण्यात आले आहे. या आदेशाविरुध्द संबधितांनी शासनाकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर शासनाने अपर आयुक्त, कोकण यांचे आदेशास स्थगिती दिलेली असून प्रकरण सुनावणीसाठी प्रलंबित आहे. तसेच या जमिनीबाबत श्री.धनाजी ठाकूर यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१८२/२०१२ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात नद्यांमधून वाळू उपसा करुन कोटयावधी रुपयाचा दंड न भरणाऱ्या वाळू तस्करांच्या जमिनीचा ७/१२ उतारावर शासनाचे नाव लावण्याबाबत.**

**(२५) ४१६५४ (२०-०४-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात नद्यांमधून वाळू उपसा करुन कोटयावधी रुपयाचा दंड न भरणाऱ्या वाळू तस्करांच्या जमिनीचा ७/१२ उतारावर शासनाचे नाव लावण्यात आल्याचे दिनांक ३०.१२.२०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी आतापर्यंत किती वाळू तस्करांवर कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने वाळू तस्करांकडून आतापर्यंत किती रक्कमेचा दंड वसूल करण्यात आला आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०८-२०१६) :**(१), (२), (३) व (४) अहमदनगर जिल्ह्यामध्ये सन २०१२ ते २०१५ या कालावधीमध्ये वाळूच्या व इतर गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत ४८५ व्यक्तींविरुध्द दंडात्मक कारवाई करुन, एकूण रुपये ६९,०२,४९,३७९/- इतका दंड आकारण्यात आला. त्यापैकी ८० व्यक्तींकडून रु.१,३७,६०,०३१/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. उर्वरीत ४०५ व्यक्तींकडून दंडाच्या रकमेच्या वसूलीसाठी त्यांच्या जमिनीच्या गाव नमुना नंबर ७/१२ वर बोजा चढवून, सदर जमिन महाराष्ट्र शासनाच्या नावे दाखल करण्याची कार्यवाही करुन दंडाच्या रकमेच्या वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील कुणबी शेतकऱ्यांना जाणूनबुजून न्याय देत नसल्याने हजारो कुळांवर होत असलेल्या अन्यायाबाबत

**(२६) ४१८६९ (२०-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील कुणबी शेतकऱ्यांना जाणूनबुजून न्याय देत नसल्याने हजारो कुळांवर अन्याय होत असल्याने येथील बेदखल कुळांनी न्याय मागण्यासांठी जानेवारी, २०१६ रोजीच्या तिसऱ्या आठवडयात व यापुर्वीही आंदोलन केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री तसेच जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडे माहे २७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास वारंवार निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कुळाना न्याय मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१६)** :(१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

तथापि, गुहागर नगरपंचायत हद्दीतील कुळवहिवाटदार, बेदखल व घरठाणचे प्रश्न सोडविण्यासाठी 'घरठाण व कुळहक्क संघर्ष समिती गुहागर' यांचे दिनांक २०.१.२०१६ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे प्राप्त झाले आहे.

(३) व (४) कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती दिनांक १२.९.२०१४ रोजी गठीत करण्यात आली असून सदर समितीने त्यांचा शिफारशीसह अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालाची शासनस्तरावरुन छाननी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नैसर्गिक आपत्ती, परप्रांतीय घुसखोरी, पर्ससीननेट ट्रॉलिचा अतिरेक वापर यामुळे कोकणातील मच्छी व्यवसाय ठप्प होत असल्याबाबत**

**(२७) ४२१९७ (२०-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील पाच-सहा वर्षापासून नैसर्गिक आपत्ती, परप्रांतीय घुसखोरी, पर्ससीननेट ट्रॉलिचा अतिरेक वापर यामुळे कोकणातील मच्छी व्यवसाय ठप्प होत चालला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मच्छीमारांना संपूर्ण डिझेल परतावा अद्यापही दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मच्छीमार कुटुंबियांची होणारी उपासमार पाहता त्यांचा डिझेल परतावा तसेच त्यांना आर्थिक आधार देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१४-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) विभागामार्फत उपलब्ध तरतूदीनुसार जिल्हानिहाय डिझेल परतावा देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात गेल्या अनेक वर्षापासून प्रशासनाच्या दुर्लक्षतेुळे पशुवैद्यकिय दवाखान्याच्या इमारतीची अवस्था अतिशय बिकट झाल्याबाबत**

**(२८) ४२४७९ (२०-०४-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात गेल्या अनेक वर्षापासून प्रशासनाच्या दुर्लक्षतेुळे पशुवैद्यकिय दवाखान्याच्या इमारतीची अवस्था अतिशय खराब झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यामध्ये चार ठिकाणी दवाखान्याची इमारती नसल्याने डॉक्टरांना मुक्या जनावरांना तात्काळ सुविधा देण्यासाठी व राहण्याकरीता कामाच्या ठिकाणी वसाहत नसल्यामुळे शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषदेंतर्गत २७ पशुवैद्यकीय दवाखान्यांना स्वत:ची इमारत असून उर्वरित ४ पशुवैद्यकीय दवाखाने ग्रामपंचायतीच्या इमारतीत कार्यरत आहेत. त्यांच्या मार्फत पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्याचे काम चालू आहे. त्यामुळे मुक्या जनावरांची व शेतक-यांची गैरसोय होत नाही.

संबंधित दवाखान्याचे अधिकारी/कर्मचारी दवाखान्याचे मुख्यालयी वास्तव्यास असल्याने पशुवैद्यकीय सेवेवर प्रतिकुल परिणाम होत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे हातनोशी (ता.भोर, जि.पुणे) येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ या दवाखान्यांचा दर्जावाढ करणेबाबत**

**(२९) ४२६९९ (२०-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हातनोशी (ता.भोर, जि.पुणे) येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ या दवाखान्यांचा दर्जा वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा दरम्यान पशुसंवर्धन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१८-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पशुवैद्यकीय, दवाखान्याचा दर्जा वाढीचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर केला असता वित्त विभागाने "राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता सद्यस्थितीत विभागाचा प्रस्ताव मान्य करणे शक्य नाही. "असे अभिप्राय दिलेले आहे. त्यामुळे अद्याप दर्जावाढ करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात तलाठ्यांना साहय करण्यासाठी नेमण्यात येणारी कोतवालांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३०) ४२७७२ (२०-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात तलाठ्यांना साहय करण्यासाठी नेमण्यात येणारी कोतवालांची तब्बल १०४६ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१) व (२) पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून त्यामध्ये एकूण ५८८ साझे आहेत. पूर्वी सदर साझास एकूण १५८६ कोतवालांची पदे मंजूर होती. परंतु शासनाच्या दिनांक ०९/०९/२००८ च्या निर्णयानुसार एका साझास एक कोतवाल या धोरणानुसार एकूण ५८८ पदांपैकी ५४४ कोतवालांची पदे भरण्यात आलेली आहेत. कोतवालांची रिक्त असलेली एकूण ४४ पदे भरणेची कार्यवाही सुरु असून, काही तालुक्यात भरती प्रक्रिया पुर्ण झाली आहे. तथापि, विशिष्ट प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्याने काही कोतवालांची पदे रिक्त आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यात ऑनलाईन सातबारा व ई फेरफार नोंदीसाठी फेरफार हाताने लिहीण्यास बंदी केल्याबाबत

**(३१) ४२९३४ (२०-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नव्या योजनेनुसार पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यात ऑनलाईन सातबारा व ई फेरफार नोंदीसाठी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ पासुन फेरफार हाताने लिहीण्यास बंदी घालुन नोंदवही तहसिल कार्यालयात जमा करण्याचे आदेश तलाठी वर्गाला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेगवान इंटरनेटसह सुसज्ज संगणक यंत्रणा, प्रशिक्षित मनुष्यबळ व इतर कामांचाही ताण यामुळे गेल्या तीन महिन्यातील कामकाजाच्या हजारो नोंदी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिरुर तालुक्यातील अनेक तलाठ्यांकडे दोन दोन गावांची जबाबदारी असल्याने ही कामे होत नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास शिरुर तहसिल कार्यालयामध्ये प्रत्येक सजेस एक तलाठी देण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०९-२०१६) :**(१) व (२) अधिकार अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे पूर्णत: संगणकीकरण करुन "ई-फेरफार" आज्ञावलीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याच्या निर्णय शासनाने दिनांक २३.१.२०१३ रोजी घेतला आहे. त्यानुषंगाने जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांच्या सप्टेंबर/ऑक्टोंबर, २०१५ मधील आदेशांप्रमाणे फेरफार हाताने लिहीण्यास बंदी घालुन नोंदवही तहसिल कार्यालयात जमा करण्याचे आदेश तलाठी वर्गाला देण्यात आले आहेत.

सर्व राज्यात "ई-फेरफार" प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी अधिकार अभिलेखांचा संगणकीकृत डाटा स्टेट डाटा सेंटर वर अपलोड करण्याची कार्यवाही एकाच वेळी सुरु असल्याने सर्व्हर्स बंद पडणे, इंटरनेटचा स्पीड कमी होणे अशा काही तांत्रिक अडचणी निदर्शनास आल्या होत्या मात्र "ई-फेरफार" आज्ञावली व्हर्जन-२ विकसित करुन ती उपलब्ध करुन देणे, मंडळस्तरावर हायस्पीड ब्रॉडबॅन्ड कनेक्टीव्हीटीसह वर्कस्टेशन्स स्थापन करणे, डाटा एन्ट्री कन्व्हेजनचा चुका दुरुस्त करण्यासाठी "ई-फेरफार" आज्ञावलीत "एडीट मोड्यूल" कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देणे, स्टेट डाटा सेंटर वर जादा स्टोरेज उपलब्ध करुन देणे अशा प्रकारच्या उपाययोजना राबवून उक्त अडचणी दूर करण्यात आल्या आहेत.

खरीप हंगामासाठी शेतकरी खातेदारांना आवश्यक असल्यास, केवळ कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनाकरीता एक विशेष बाब म्हणून दि. ३१ जून, २०१६ पर्यंत हस्तलिखित अधिकार अभिलेखावरुन गा.न.नं. ७/१२ उतारे देण्याची मुभा प्रदाने करण्यात आली होती.
(३), (४) व (५) शिरुर तालुक्यात एकूण ४९ सजा असून त्यापैकी ११ सजा रिक्त असून ३८ पदे कार्यरत आहेत.

जिल्हाधिकारी पुणे यांनी तलाठ्यांच्या रिक्त असलेल्या पदांवर नियुक्तीची प्रक्रिया राबवून शिरुर तालुक्यातील ८ तलाठी पदे भरणेबाबत उमेदवार संबंधित उपविभागास उपलब्ध करुन दिले असून त्यापैकी ७ नवीन तलाठी शिरुर तालुक्यातील रुजू झालेले आहेत.

---

**ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील घाटघर उदंचन परिसरातील जमिन संपादीत केलेल्या धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घेण्याबाबत**

**(३२) ४३०६७ (२०-०४-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी बीड, साकुर्ली व परिसरातील जमिन संपादीत केलेल्या धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेऊन धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना सेवेसाठी पात्र ठरविण्याकरिता जलविद्युत मंडळ एकलहरे नाशिक येथे प्रशिक्षणासाठी पाठविलेल्या प्रकल्पग्रस्त मुलांनी प्रशिक्षण पुर्ण केले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, प्रकल्पाग्रस्तांच्या मुलांनी प्रशिक्षण पुर्ण करुन त्याना अद्यापही नोकरीत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घेण्यात यावेत अशी विनंती लोकप्रतिनिधींनी माहे. १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास या निवेदनाच्या अनुषंगाने, धरणग्रस्तांच्या मुलांना नोकरीत त्वरीत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) भरती प्रक्रियेचे सर्व टप्पे पूर्ण केल्याशिवाय कोणालाही महानिर्मिती कंपनीच्या सेवेत सामावून घेण्यात येत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रासह प्रकल्पग्रस्त आरक्षणांतर्गत अर्ज सादर करणे आवश्यक असून, गुणवत्तेनुसार पात्र होणे आवश्यक आहे. त्यानंतर महानिर्मिती कंपनीतर्फे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदूर रेल्वे उपविभागांतर्गत चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील मंडळ अधिकारी, व तलाठी यांचेकरीता निवास्थानाचे बांधकाम केल्याबाबत**

**(३३) ४३१९१ (२०-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे उपविभागांतर्गत चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील मंडळ अधिकारी, व तलाठी यांचेकरीता अंदाजे रु.१४.५० कोटी किंमतीची कार्यालय व निवासस्थाने इमारतीचे बांधकाम करण्यात आले. असून या ठिकाणी

मंडळ अधिकारी व तलाठी राहत नसतानाही त्यांना घरभाडे भत्ता सुरुच असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित अधिकारी यांनी शासनाची फसवणूक केली असल्याने त्याच्यावर करवाई करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे १८.जानेवारी.२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकश केली आहे काय आहे,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने शासनाची फसवणूक करणाऱ्या अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१६) :**(१), (२), (३) व (४) चांदूर रेल्वे तालुक्यात मंडळ अधिकारी-०५ व तलाठी-३० अशी एकूण ३५ कार्यालये व निवासस्थाने असून, त्यापैकी मंडळ अधिकारी-०५ व तलाठी-२७ अशी एकूण ३२ निवासस्थाने व कार्यालये ताब्यात घेण्यात आलेली आहेत. उर्वरित ०३ निवासस्थानांचे काम अपूर्ण असल्यामुळे ते ताब्यात घेण्या आलेले नाहीत. ती कामे पूर्ण होताच सार्वजनिक बांधकाम विभाग, चांदूर रेल्वे यांच्याकडून ताब्यात घेण्यात येतील.

धामणगांव तालुक्यात मंडळ अधिकारी-०७ व तलाठी-४१ अशी एकूण ४८ कार्यालये व निवासस्थाने असून, त्यापैकी मंडळ अधिकारी-०६ व तलाठी-३८ अशी एकूण ४४ निवास्थाने व कार्यालये ताब्यात घेण्यात आलेली आहेत. उर्वरित मंडळ अधिकारी-०१ व तलाठी-०३ अशी एकूण ०४ कार्यालये व निवासस्थाने सार्वजनिक बांधकाम विभाग, चांदूर रेल्वे यांनी अद्याप पर्यात ताब्यात दिलेले नाहीत. त्यामुळे ती ताब्यात घेता आलेली नाहीत.

नांदगांव खंडेश्वर तालुक्यात मंडळ अधिकारी-०६ व तलाठी-४७ अशी एकूण ५३ कार्यालये व निवासस्थाने असून, त्यापैकी बांधकाम व सुविधा असलेली मंडळ अधिकारी-०३ व तलाठी-१९ अशी एकूण २२ निवासस्थाने व कार्यालये ताब्यात घेण्यात आलेली आहेत. उर्वरित ३१ कामे सुरु असल्यामुळे ताबा घेण्यायोग्य झाल्यानंतर सदर कार्यालये व निवासस्थानांचा सार्वजनिक बांधकाम विभाग, बडनेरा यांच्याकडून ताबा घेण्यात येईल.

सदर प्रकरणी दिनांक १८.०१.२०१६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उप विभागीय अधिकरी, चांदूर रेल्वे यांना निवेदन दिलेले आहे. मात्र उक्त ताब्यात घेतलेल्या निवासस्थानांपैकी ज्या मंडळ अधिकारी व तलाठी यांना निवासस्थने देण्यात आलेली आहेत. त्यांच्या वेतनातून दरमहा घरभाडे भत्ता कपात करण्यात येतो. त्यामुळे घरभाडे भत्ता सुरु ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ले-खवणे समुद्रात पारंपारिक मच्छिमारांच्या क्षेत्रात स्थानिक मिनी पर्ससीननेटने अतिक्रमण केल्याबाबत**

**(३४) ४४१५३ (२०-०४-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ले-खवणे समुद्रात पारंपारिक मच्छिमारांच्या क्षेत्रात स्थानिक मिनी पर्ससीननेटने अतिक्रमण केल्याने खवणे येथील संतप्त मच्छिमारांनी सहाय्यक मस्त्यव्यवसाय आयुक्त कार्यालयावर दि. १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मोर्चाचे आयोजन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वेंगुर्ले-खवणे समुद्रात स्थानिक पर्ससीननेटचे अतिक्रमण होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१४-०७-२०१६) :**(१) हे अशंत: खरे आहे.

खवणे, ता.वेंगुर्ला येथील काही पांरपारिक मच्छिमारांनी दि.३०.१२.२०१५ रोजी बेकायदेशीर पर्ससीननेट व्दारे मासेमारी केले बाबतचे निवेदन विभागाच्या सिंधुदूर्ग कार्यालयात दिले आहे.

(२) होय.

(३) खवणे, ता.वेंगुर्ला येथील समुद्रात दि.३०.१२.२०१५ रोजी विनापरवाना पर्ससीननेटने मासेमारी करणा-या नौकेवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन, अधिनियम, १९८१ अंतर्गत तरतूदीनुसार कारवाई केली असून पुढील कारवाईसाठी अभिनिर्णय अधिकारी यांचेकडे प्रतिवेदन दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनवर्सन योजनेमध्ये पात्र व अपात्र रहिवाशी सदनिका यांना मुद्रांक शुल्क १०० रु आकारण्यात येत असल्याबाबत**

**(३५) ४४५०९ (०३-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनवर्सन योजनेमध्ये पात्र व अपात्र असलेल्या रहिवाशी यांच्या सदनिकांना मुद्रांक शुल्क १०० रु आकारण्यात येतो तर याच योजनेतील गाळे धारक व व्यावसायिक यांना मुंद्राक शुल्काच्या नियमाप्रमाणे बाजार मुल्य भावाने आकारण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सेल्फ डिक्लेरेशन व्यवस्था बंद असल्याने परिणामी नोंदणी होत नसल्याने तेथील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कायदयात नव्याने सुधारणा करण्याची लोकप्रतिनिधी व नागरकांनी माहे जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०९-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) होय.
(५) शासन अधिसूचना क्र.एस.टी.पी-१०९६/४५६५/सीआर ९१५/म-१, दि. १९/१२/१९९७ ही केवळ मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्ह्याकरिताच लागू होती. तसेच शासन अधिसूचना क्र.मुद्रांक-२००२/९४१/सीआर २१७/एम-१, दि. ४/३/२००८ ही निवासी गाळ्यांच्या प्रयोजनार्थ आहे. करारनाम्यातील मिळकत पाचपाखाडी, ठाणे येथील असून करारनामा दुकान गाळ्यांचा असल्याने अधिसूचनेतील तरतूदीचा लाभ देता येणार नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड तालुक्यातील (जि.रायगड) बिरवाडी येथील तलाठी कार्यालय बंद असल्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याबाबत**

**(३६) ४४६०९ (२०-०४-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) बिरवाडी येथील तलाठी कार्यालय बंद असल्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलाठी कार्यालय बंद असल्यामुळे कामानिर्मित येणा-या नागरीकांना ताटकळत बसावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालय बंद राहण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कार्यालय चालू करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६)** :(१), (२), (३), (४) व (५) महाड तालुक्यातील साझा बिरवाडी येथील तलाठी पदावरील कर्मचारी दिनांक ०८/१२/२०१५ ते १४/१२/२०१५ पर्यंत विनापरवाना गैरहजर असल्यामुळे सदर तलाठी साझाचा अतिरिक्त कार्यभार दहिवड साझात कार्यरत असलेल्या तलाठ्याकडे सुर्पूद करण्यात आला होता. सदर तलाठ्याने अतिरिक्त कार्यभार स्विकारुन साझाचे कामकाज सुरळीत चालू ठेवले आहे.

बिरवाडी साझाचे तलाठी पदावरील कर्मचारी विनापरवानगी गैरहजर राहिल्याने संबंधित कर्मचारी यांना तहसिल कार्यालय, महाड यांचेकडून कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा खुलासा घेण्यात आला असता, त्यांचा खुलासा अमान्य करुन त्यांची बदली बिरवाडी साझावरुन तलाठी साझा कोंझर येथे करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**५० वर्षाहून अधिक काळ जमिनीची वाहिती करणाऱ्या राज्यातील शेतकरी बांधवांच्या जमिनी नांवे करण्याकरिता कूळ कायदयात आवश्यक त्या सुधारारणा करण्याबाबत**

**(३७) ४५०२२ (२०-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात ४००० महसूली टेनंसी प्रकरणे प्रलंबित असून ५० वर्षापासून जमिनीची वाहिती करणाऱ्या अमरावतीसह राज्यातील शेतकरी बांधवाच्या जमिनी त्यांच्या नावे करण्याकरिता कूळ कायदयात आवश्यक त्या सुधारणा करण्याकरिता लोकप्रतिनीधी अचलपूर यांनी माहे. २० जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. महसूल मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली होती हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ५० वर्षापासून वाहिती करण्याच्या या शेतजमिनी शेतकऱ्यांच्या नांवे करण्याकरिता कूळ कायदयातील आवश्यक सुधारणा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६)** :(१) लोकप्रतिनिधी अचलपूर विधानसभा मतदारसंघ यांचे अशा आशयाचे दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजीचे निवेदन या विभागास प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडून मागविण्यात आलेल्या अहवालानुसार अमरावती जिल्हयातील सर्व तहसील कार्यालयात मिळून दि.३१ मे, २०१६ अखेर २८० अर्ध-न्यायिक प्रकरणे कार्यवाहीस्तव प्रलंबित आहेत.

तथापि, उक्त निवेदनात नमूद केल्यानुसार, कुळ कायद्याच्या तरतूदीत सुधारणा करण्याची लोकप्रतिनिधीची मागणी विधी व न्याय विभागाशी विचार विनिमय करुन तपासण्यात येत आहे.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्याच्या भूमिअभिलेख कार्यालयात जमीन मोजणीचे निर्णय गैरपध्दतीने दलालांमार्फत करण्यात येत असल्याबाबत**

**(३८) ४५२४१ (२०-०४-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्याच्या भूमिअभिलेख कार्यालयात जमीन मोजणीचे निर्णय गैरपध्दतीने दलालांमार्फत करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शानास आले आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सामान्य नागरिकांच्या जमीनीच्या मोजणी संदर्भातील निर्णय सुलभ पध्दतीने होण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकात पाटील (०३-०९-२०१६) :**(१), (२) व (३) सर्वसाधारणपणे असे निदर्शनास आले नाही.

तथापि, सप्टेंबर, २०१५ मध्ये झालेल्या एका जमीन मोजणीच्या प्रकारणात हद्दीत दाखविण्याच्या टप्प्यावर, मोजणीची नोटीस तामील झाली नसल्याच्या कारणास्तव लगतच्या भूधारकांकडून नोव्हेंबर, २०१५ मध्ये हरकत प्राप्त झाली होती. सदर प्रकरणी विहित प्रक्रिया पार पाडून नंतर नव्याने मोजणी करण्यात आली आहे.

मोजणी प्रकरणांचे नियंत्रण करणारी संगणक आज्ञावली “ई-मोजणी” दिनांक ०१.०१.२०१२ पासून राज्यामध्ये लागु करण्यात आली आहे. तसेच जमाबंदी आयुक्तांनी दि. ०८.०८.२०१३ च्या परिपत्रकान्वये मोजणी प्रकरणांचे संधारण, अभिलेख दुरुस्ती, अभिलेख नाशात काढणे इत्यादीबाबत सविस्तर कार्यपध्दती विहीत केली आहे मोजणी प्रकरण कार्यालयात दाखल झाल्यापासून ते निकाली होईपर्यंतच्या विविध टप्प्याचे नियंत्रण “ई-मोजणी” आज्ञावलीतून केले जाते. त्यामुळे याबाबतच्या कार्यवाहीत पुर्णत: पारदर्शकात आली असून अपवादात्मक प्रसंग वगळता राज्यात या आज्ञावलीची अंमलबजावणी सुरळीत व प्रभावीपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तत्कालीन युध्दजन्य परिस्थित डिफेन्स ऑफ इंडियाने तात्पुरत्या स्वरुपात ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या घेतलेल्या जागा परत मिळण्याबाबत**

**(३९) ४५८९६ (२०-०४-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन युध्दजन्य परिस्थित डिफेन्स ऑफ इंडियाने तात्पुरत्या स्वरुपात ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जी जमिन ताब्यात घेतली आहे ती जमिन शेतकऱ्यांना परत मिळण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे १७ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने शेतकऱ्यांना जमिन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांना संबंधीत लोप्रतिनिधी यांनी दिनांक १६.३.२०१५ रोजी रोजीच्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, नेवाळी विमानतळासाठी Defence of India Rules, नुसार कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील जमीन अधिग्रहीत (Requisition) करण्यात आली आहे. अंबरनाथ तालुक्यातील मौजे चिंचवली, आंबोशी, वसार, भाल, नेवाळी, आडीवली, द्वारली, मांगरुळ व काकडवाल या ९ गावातील एकूण ४२१.६३.५ हे. आर जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली आहे. कल्याण तालुक्यातील मौजे नेतीवली, नांदिवली उर्फ अंबरनाथ, खोणी, वडवली बु. व धामटण या गावातील एकूण क्षेत्र २५५.४१.९ हे .आर क्षेत्र व मौजे तिसगाव, पिसवली या गावातील एकूण क्षेत्र ५.५४.० हे. आर. नेवळी एरोड्रोमच्या नावे अधिग्रहीत करण्यात आलेले आहे.

सदर जमिनी ह्या नेवाळी एरोड्रम, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे नावे करण्याबाबत उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचेकडील आदेश क्र.आरटी. एस/अपील नं.९३/२०१०, दि.२०.९.२०१० अन्वये अधिकार अभिलेखात नोंदी घेण्यात आल्या आहेत. नेव्ही, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे अर्जावरुन दि.२७ ते ३० एप्रिल व दि.११ व १३ मे, २०१५ रोजी जागेची मोजणी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, अंबरनाथ यांचेकार्यालयाने केलेली आहे. वरील मिनी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट व रुल्स नुसार अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत. सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १२३३६ कोतवालांनी अत्यंअल्प मानधन मिळत असल्यामुळे त्यांना चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणुन शासनाच्या सेवेत सामावुन घेण्याबाबत**

**(४०) ४६४२६ (२०-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२३३६ कोतवालांनी अत्यंअल्प मानधन मिळत असल्यामुळे त्यांना चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणुन शासनाच्या सेवेत सामावुन घेण्याची मागणी शासनाकडे अनेक वर्षापासुन प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोतवालांना शासनसेवेत सामावुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०७-२०१६) :**(१) व (२) राज्यातील कोतवालांची प्रमुख मागणी चतुर्थ श्रेणी दर्जा देण्याबाबत आहे. त्यानुषंगाने कोतवालांच्या विविध संघटनांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा मिळावा या संबंधीच्या माणगी संदर्भात संबंधित विभागाकडून प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन सदर प्रस्ताव शासन स्तरावर अमान्य करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर मत्स्य व्यवसाय विभागातील अनेक वर्षे रिक्त असलेली पदे पदवीधरांमधून भरणेबाबत**

**(४१) ४६५८१ (२१-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मत्स्य सारस विज्ञान महाविद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कार्यानुभव भत्ता देवून यापुढे मत्स्य व्यवसाय विभागातील अनेक वर्षे रिक्त असलेली वर्ग १ ते ३ ची पदे मत्स्य व्यवसाय पदविधरांमधून तातडीने भरण्याबाबत दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी लोकप्रतिनीधी. अचलपुर यांनी राज्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने वर्ग १ ते ३ ची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र मत्स्यविज्ञान विद्यापीठ व बाबासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) सन २०१५ मध्ये गट-क (तांत्रिक) वर्ग-३ सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी या संवर्गातील केवळ B.F.Sc व M.F.Sc उमेदवारांमधून २२ पदे आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयामार्फत भरण्यात आली आहेत. मत्स्यसेवा गट-ब (तांत्रिक) संवर्गातील वर्ग-२ ची १५ पदे पदोन्नतीने मे, २०१६ मध्ये भरली आहेत. तसेच अ.मु.स. (सेवा) साप्रावि यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने गट-क (तांत्रिक) संवर्गातील ५० पदे भरण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार पदभरतीस मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी तालुक्यातील (जि.नाशिक) पूर्व भागातील अस्वली स्टेशन येथील पशुवैद्यकीय केंद्र दोन वर्षापासून बंद असल्याबाबत**

**(४२) ४६६७४ (२०-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी तालुक्यातील (जि.नाशिक) पूर्व भागातील अस्वली स्टेशन येथे श्रेणीचे दोन पशुवैद्यकीय केंद्र दोन वर्षापासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील शेतकऱ्यांना खाजगी रुग्णालयात जावे लागत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे पशुवैद्यकिय केंद्र बंद असण्याचे कारणे काय आहेत,

(४) असल्यास, बंद असलेले पशुवैद्यकीय केंद्र तातडीने सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१८-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ अस्वली स्टेशन ता.इंगतपूरी जि.नाशिक येथील पशुधन पर्यवेक्षकांचे पद रिक्त असून या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन पर्यवेक्षक पंचायत समिती इगतपुरी यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे व सदरचे केंद्र नियमीतपणे सुरु आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धाकटी डहाणू व गुंगवाडा ता.पो.डहाणू जि.पालघर येथील मच्छीमार वि.का.स.सो.लि.संस्था बंद होत असलेबाबत**

**(४३) ४७८०६ (२७-०४-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाकटी डहाणू व गुंगवाडा ता.पो.डहाणू जि.पालघर येथील मच्छीमार वि.का.स.सो.लि. संस्थेकडून दिला जाणारा डिझेल विक्री पुरवठा इतर संस्थाना देण्यात आल्यामुळे सदर संस्थेचे आर्थिक नुकसान होत असून संस्था बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय ठाणे/पालघर यांनी मंजूर करुन दिलेल्या डिझेल कोठाविरुध्द दिनांक ९ ऑगस्ट २०१५ रोजी झालेल्या वार्षिक सभेतील ठरावानुसार तेथील जवळच्या रिलायन्स कंपनीच्या कोळसा वाहतूक बार्जेस मधून मोठ्या प्रमाणात चोरट्या पध्दतीने व गैरव्यवहाराने अल्प दरात मिछिमारांना डिझेल वाटप होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त विषयी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१८-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) यासंदर्भात विभागाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र किनारपट्टीवर पर्सनेट मच्छिमारी करण्यास नवीन परवाने दिल्याबाबत**

**(४४) ४८१७१ (२०-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र किनारपट्टीवर पर्सनेट मच्छिमारी करण्यास सन २०१२ मध्ये नवीन परवाने देण्याचे बंद केले असतांना शासनाने परत नवीन परवाने देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्सनेट मासेमारी परवाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वितरीत करण्यात आलेले नाहीत अशी तक्रार आचरा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील मच्छिमारांनी मत्स्य आयुक्तांकडे निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास तक्रारीच्या अनुषंगाने आतापर्यंत मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार परवाने न देणा-या अधिका-याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१४-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात भूदान समितीद्‌वारे जिल्हयात भूमिहिनांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीच्या पटट्यांचे भोगवटादार वर्ग बदलले जात असल्याबाबत**

**(४५) ४८३८९ (२०-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भूदान समितीद्‌वारे जिल्हयात भूमिहिनांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीच्या पटट्यांचे भोगवटादार वर्ग बदलले जात असल्याची माहे जाने, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून व त्याअनुषंगानेक संबधित दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०७-२०१६)** :(१) राज्यात वर्धा जिल्ह्यात काही प्रकरणी भूदान समितीद्वारे भूमिहिनांना वाटप केलेल्या जमिनींच्या पट्टयाचे भोगवटदार वर्ग-२ मधुन भोगवटदार वर्ग-१ याप्रमाणे रुपांतर झाल्याचे माहे जुलै, २०१५ व ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे. इतर जिल्ह्यात अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) वर्धा जिल्ह्यात आढळून आलेल्या प्रकरणात चौकशी सुरु असुन चौकशी अंती दोषीवर कारवाई करण्याचे संकल्पीत आहे. ता.हिंगणघाट येथील एका प्रकरणात संबंधीत तलाठी यांना निलंबीत करण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड तालुक्यातील (जि.पुणे) शेतकऱ्यांच्या पशूधनास त्वरित उपचार मिळणेबाबत कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(४६) ४८४५३ (२०-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यातील (जि.पुणे) शेतकऱ्यांच्या पशूधनास त्वरित उपचार मिळणेबाबत कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेड, आंबेगाव, जुन्नर, मावळ या चार तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पशुधनाला त्वरित उपचार मिळावे या दृष्टीने राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) येथे बांधण्यात आलेल्या तालुका लघु सर्वपशू चिकित्सालयाची नवीन इमारतीचे बांधकाम होऊनही दोन वर्ष वापराविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वापराविना पडून असलेली चिकित्सालयाची इमारत सुरु करणेबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

खेड, जि. पुणे तालुक्यात तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकात्सालय, जिल्हा परिषदेंतर्गत श्रेणी-१ चे पशुद्यकीय दवाखाने जिल्हा परिषदेंतर्गत श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाने, राज्यस्तरावरील श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाने हे अनुक्रमे १, ११, १३ व १३ असे एकूण ३८ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत असून, त्यांचेमार्फत कार्यक्षेत्रातील शेतकरी/पशुपालक यांच्याकडील रुग्ण पशुंना पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

खेड, आंबेगांव, जुन्नर व मावळ या चार तालुक्यात एकूणन श्रेणी-१ चे ४९ पशुवैद्यकीय दवाखाने, श्रेणी-२ चे ७४ पशुवैद्यकीय दवाखाने तसेच १ फिरते पशुवैद्यकीय चिकित्सालय अशा एकूण १२४ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत असून, त्यांच्यामार्फत कार्यक्षेत्रातील

शेतकरी/पशुपालकांकडील पशुधनास पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे पुरविण्यात येत आहेत. पशुसंवर्धन विभागाने तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकात्सालय, राजगुरुनगर, ता.खेड, जि. पुणे येथील नवीन इमारतीचा ताबा दि. १४.०६.२०१६ रोजी घेतलेला आहे व सदर इमारतीमध्ये तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, राजगुरुनगर, ता. खेड चे स्थलांतर करण्यात येऊन या नवीन इमारतीमधून पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

---

**वैरागड, तालुका आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथ अज्ञात रोगाने ग्रस्त सात जनावरे वैद्यकीय उपचारा अभावी दगावली असल्याबाबत**

**(४७) ४८५४७ (२०-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैरागड, तालुका आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथ अज्ञात रोगाने सात जनावरे वैद्यकीय उपचारा अभावी दगावली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे पद मागील तीन वर्षापासुन रिक्त आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पद रिक्त असण्याचे कारणे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त असलेले पद भरण्याबाबत काय कार्यवाही करण्यात अली आहे वा करण्यात येत आहे

(५) तसेच उपचारा अभावी दगावलेल्या जनावरांची शासनानाकडून नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२०-०७-२०१६) :**(१) हे खरे नसून उपचारानंतर एक बैल दगावलेला आहे.

(२) होय, पशुधन विकास अधिकारी हे पद दि. ११.१०.२०१३ पासून रिक्त आहे. तथापि, सदर दवाखान्याचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना, देलनवाडी, ता.आरमोरी यांच्याकडे आहे.

(३) डॉ. व्ही.व्ही. गणवीर यांच्या मृत्युने हे पद रिक्त झालेले आहे.

(४) राज्यातील रिक्त असलेल्या पशुधन विकास अधिकारी यांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) व (६) सदर बैलाचा मृत्यु हा नैसर्गिक आपत्तीने झालेला नसल्याने तसेच, सदर बैलाचा विमा देखील उतरविलेला नसल्याने मृत बैलाच्या मालकास नुकसान भरपाई देय होत नाही.

---

**जालना जिल्हयातील गोदावरी दुधना,पुर्णा नदीपात्रातून गत दहा वर्षापासून महसूल अधिकारी व पोलीस यांच्या संगनमताने रेतीचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(४८) ४८५६७ (२०-०४-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील गोदावरी दुधना, पुर्णा नदीपात्रातून गेल्या दहा वर्षापासून महसूल अधिकारी व पोलीस यांच्या संगनमताने रेतीचे उत्खनन होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रेतीचे उत्खनन करण्यास जबाबदार असणाऱ्या महसूल व पोलीस अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) जालना जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीस आळा घालण्यासाठी उपविभागीय स्तरावर तसेच तालुकास्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. सदर पथकामार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येत असून, गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. त्यानुसार सन २०१५-१६ या वर्षात एकूण ३२२ प्रकरणात रु. १,६०,४९,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीबाबत जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या स्तरावर दरमहा आढावा घेण्यात येत असून, अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्याच्या सूचना देण्यात येतात.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणात महसूल अधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक एकलहरे येथील वीज निर्मिती केंद्रातील दोन संच बंद पडल्याबाबत**

**(४९) ६३१८९ (१८-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक एकलहरे येथील वीज निर्मिती केंद्रातील दोन संच बंद पडल्यामुळे औष्णिक वीज निर्मिती केंद्रामुळे सुमारे दिड कोटी रुपयाचे महानिर्मिती कंपनीचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिनांक २६ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास झालेल्या अर्थिक नुकसानीचा खर्च भरुन घेण्याची तरतूद वीज कंपनी कायदयात नसल्याने, यापुढे अशी घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली आहे वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परांडा-भूम-वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील पशुवैद्यकिय दवाखान्यातील पशुवेद्यकिय अधिकाऱ्यांची तसेच परिचारकांची रिक्त असलेली पदे

**(५०) ६३६०१ (१२-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा-भूम-वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील मु.पो.तांदूळवाडी येथे तीन वर्षापुर्वी पशूवैद्यकिय दवाखाना सुरु होवून, त्याठिकाणी पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांची तसेच परिचारकांची पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांच्या तालुक्यातील तांदूळवाडी, येसवंडी, जवळका, सरमकुंडी, महालदापुरी या गावांतील पशूपालकांची रिक्त पदांमुळे मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी तसेच शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पशुवैद्यकिय दवाखान्यात अधिकाऱ्यांची व परिचारकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-१०-२०१६) :**(१) (२) (३) हे खरे नाही.

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ तांदूळवाडी, ता.वाशी, जि.ऊस्मानाबाद येथील पशुधन विकास अधिकारी, हे पद भरलेले असून परिचरांचे पद रिक्त आहे. पशुपालक धारकांना नियमितपणे वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येत असून त्याबाबत लोकप्रतिनिधी अथवा पशुपालक धारकांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) व (६) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ तांदूळवाडी, ता.वाशी, जि.उस्मानाबाद येथे नियमित पशुधन विकास अधिकारी कार्यरत आहेत, परिचराचे पद रिक्त असले तरी अन्य कर्मचाऱ्यांकडे कामकाज सोपवून पशुपालकांना नियमितपणे वैद्‌यकीय सोयी सुविधा पुरविल्या जात आहेत.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.